दिनांक २४/०७/२०१८

:: **प्रेस नोट** ::

**तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय देगलूर येथील कृष्ठरोग तंत्रज्ञ श्री संजय राजेंद्र दाचावार व प्राथमिक आरोग्य उप केंद्र तमलूर येथील आरोग्य सेविका श्रीमती कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे १,०००/—रूपयाची लाचेची मागणी करून तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडुन १,०००/—रु. लाच स्विकारतांना कृष्ठरोग तंत्रज्ञ, श्री संजय राजेंद्र दाचावार रंगहाथ पकडले.**

तक्रारदार यांनी दिनांक २१/०२/२०१८ रोजी पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड कडे तक्रार दिली की, त्यांचे पत्नीचे कुंटुब नियोजन शस्त्रक्रियेसाठी उप जिल्हा रुग्णालय, देगलूर येथे अ‍ॅडमीट केले असुन सदर शस्त्रक्रिया रुग्णालयातील डॉक्टरांना सांगुन करुन देण्यासाठी मदत करतो असे म्हणुन प्राथमिक आरोग्य उप केंद्र तमलूर ता.देगलूर येथील आरोग्य सेविका श्रीमती कांबळे व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय देगलूर येथील कृष्ठरोग तंत्रज्ञ श्री संजय राजेंद्र दाचावार असे दोघांनी ३,०००/—रु. लाचेची मागणी करुन दिनांक २०/०७/२०१८ रोजी १,०००/—रु. घेतले व उर्वरित २,०००/—रु. लाचेची रक्कम आणुन देण्यास सांगितले आहे. वगैरे मजकूराची तक्रार नोंदविले होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने नांदेड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून दिनांक २४/०७/२०१८ रोजी पंचासमक्ष केलेल्या लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार यांना नमुद कामासाठी आरोग्य सेविका श्रीमती कांबळे यांनी तक्रारदार यांना २,०००/—रु. लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १,०००/—रु. श्री दाचावार यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले त्यावरुन श्री दाचावार यांचेकडे लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी सुध्दा तक्रारदार यांचेकडे नमुद कामासाठी १,०००/—रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दिनांक २४/०७/२०१८ रोजी उप जिल्हा रुग्णालय, देगलूर परिसरात पंचासमक्ष सापळा लावला असता सापळा कार्यवाही दरम्यान श्री दाचावार यांनी नमुद कामासाठी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष १,०००/—रू. लाचेची रक्कम स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

प्रस्तुत प्रकरणात लोकसेवक श्री संजय राजेंद्र दाचावार, वर्षे ५१, कृष्ठरोग तंत्रज्ञ, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय देगलूर जि. नांदेड व श्रीमती व्ही.आर.कांबळे, आरोग्य सेविका, प्राथमिक आरोग्य उप केंद्र तमलूर ता.देगलूर यांचेविरुध्द पोलीस ठाणे देगलूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणीचे मोबाईल फोनवर लोकसेवक यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबधाने कांही माहिती असल्यास किंवा माहिती अधिकारात शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रंमाकावर संपर्क करावा.

१) टोलफ्री हेल्पलाईन क्रंमाक :— १०६४ (२) कार्यालयाचा फोन क्रंमाक ०२४६२—२५३५१२

३) श्री संजय कुलकर्णी, पो.उप अधि.यांचा मोबाईल क्रंमाक ८५५४८५२९९९

Website :- www.acbmaharashtra.gov.in, Mobile App :- www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharashtraACB

कार्यालय, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.नांदेड, युनिट

( संजय कुलकर्णी )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड.